॥ चतुर्पती कृष्ण अवधुत पंथ ॥

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥

॥ चतुर्पता अथर्वन् वेद उभा राहीन पोटी । निजरूप भुम्मा जागी करन सारी सृष्टी ॥

# चतुर्पता
# ॥ अथर्वन् वेद ॥

॥ ग्रंथ प्रवेशव्दार दर्शन भाग ०१ ॥

॥ चतुर्पता अथर्वन् वेद ॥

## ॥ प्रस्तावना ॥

**शब्दार्थ, चरणार्थ निरसन स्पष्टीकरन सह**

॥ चतुर्पती कृष्ण अवधुत पंथ ॥

चतुर्पता

अथर्वन् वेद

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥

www.chaturpata-atharvan-ved.com

B: Blank Page84

॥ भाग ०१ ॥

॥ चतुर्पता अथर्वन् वेद ॥

# ॥ प्रस्तावना ॥

आदीपुरूषाचा पुर्ण अवतार कृष्णाजी च्या मुखातुन निघालेल्या अनमोल रत्नांच्या सांगी व्दारे प्रकट झालेल्या या चतुर्पता अथर्वन् वेदाचे गायन अंदाजे ई.सन. १७०० शतकातील आहे. या चतुर्पता अथर्वन् वेदाचे गायन आकाशवाणी, आवाजा व्दारे कृष्ण समयापासुन वर्तमान समयापर्यंत येवुन पोहचले आहे. मुखपाठ पाठांतरा व्दारे या चतुर्पता अथर्वन् वेदाचे गायन भजनी भक्तयोगी च्या पिढयांन पिढयांव्दारे आजपर्यंत पोहचलेले आहे. आकाशमात मधील निर्गुण गादीवर चे चतुर्पता निरंजन ग्यान असलेले चतुर्पता अथर्वन् वेदाचे गायन कृष्णकालीन महाराज, जाणते योगी मुनी संता व अठरा खेत्री द्युत ईत्यादींनी मौखीक ठेवण्याची सुरूवातीच्या काळात सक्ती केली होती. कारण की :

१. ही मुळावरचे गायन असलेली आकाशमात मधील आकाशवाणी चे चतुर्पता निरंजन ग्यान असलेली ''मुळ भागवता'' समकालीन स्वार्थि सत्ताधारी पंडीतांच्या हाती लागु नये. कारण की :

२. जर ही आकाशमात मधील आकाशवाणी चे ग्यान असलेली मुळ भागवता म्हणजेच चतुर्पता अथर्वन् वेद हा स्वार्थि पंडीतांच्या हाती लागला, तर ईतर वेदाची जी गत झाली ती गत या वेदाची होवु शकते. ज्याप्रमाणे ईतर वेदात काही स्वार्थि विद्वान शास्त्र पंडीतांव्दारे स्वतःच्या पोटा-पाणी व मानसन्मान करीता पुजापाठ व्रते, कर्मकांड युक्त तिरगुणी ज्ञान महीमा बध्दलचे श्लोक-चरणे घुसडवुन हे वेद या नाशीवंताने नाशवलेत आहेत. त्याचप्रमाणे या चतुर्पता अथर्वन् वेदात काही स्वार्थि विद्वान सत्ताधारी पंडीतांव्दारे स्वतःच्या पोटा-पाणी व मानसन्मान करीता पुजापाठ व्रते, कर्मकांड, युक्त तिरगुणी देवताचे कथासार स्तुति ज्ञान महीमा बध्दलचे श्लोक-चरणे घुसडण्याची त्यांच्याकडुन शक्यता आहे. या चतुर्पता अथर्वन् वेदाव्दारे स्वतःच्या पोटा-पाण्याची व्यवस्था करून, स्वतःच मानसन्मान मिळवुन या चतुर्पता गाई ला बेईमान होण्याची शक्यता आहे. या चतुर्पता व्दारे आपली तिरगुणी कर्मकांडयुक्त ज्ञानांचीच महीमा वाढवण्याची शक्यता आहे. स्वार्थि पंडीताकडुन ही मुळ भागवता नाश करण्याची शक्यता आहे.

म्हणुन हा चतुर्पता अथर्वन् वेद त्यांच्या हाती लागु नये. अशी व्यवस्था चतुर्पतीच्या जाणत्यांनी करून ठेवली होती. चतुर्पतीचे जाणते हे ''ईतर वेदांची काय गत झाली ?'' हे चांगल्या रितीने जाणत होते. त्यांच्या समोर तत्कालीन सत्ताधारी पंडीतशाही व वेदांचे ज्वलंत उदाहरण होते. ते असे :

३. पुर्वि जेव्हा सृष्टी उत्पन्न होवुन सर्व जीवांचा विस्तार झाला, त्यावेळी

॥ आधी नव्हत्या जाती पाती, पहा हो मुळात ।
तेव्हा एकच वर्ण होता, अहीन अजात ॥ खंड०२/१४

सर्वप्रथम आधी स्थानी त्यावेळी जाती-भेद नसुन अजाताचा पृथ्वा होती. विटाळ न धरने. स्पृश्य-अस्पृश्य न मानने. समसमानता ठेवने. शुध्द मन भावाचे फुल पुष्प वाहत सच्ची भक्ती करने. हेच तेव्हा सर्वजन जाणत होते. तिरगुणी मायेव्दारे उत्पन्न त्रिदेवांच्या तिरगुणी ज्ञानाची महिमा, व्रते, कर्मकांड उपासना पध्दती पुजा-पाठ ईत्यादी आधीचे सत् जन जाणत नव्हते. त्याकाळी ते सर्वजन फक्त अहीना घरचे मुळ ग्यानच जाणत होते. त्यामुळेच आकाशवाणी करणा-या

फक्त एकाच अहिन अजात निर्गुण निराकार निराधार परमात्मा धनीदेवाला भजत होते. मन-भावाचे फुल-पुष्प वाहत होते.

आकाशवाणी करणारा निराकार निरंजन निर्गुण अश्या मुळयवगाच्या सत्य धनीदेवाची सच्च्या सद्भावाने, प्रेम भावाने ते सर्वजन ग्यान-भक्ती करत होते. चैतन्यमय आदीपुरुषाला भजत असे. आणी ज्याला भक्ती अत्यंत प्रिय आहे, असा तो निर्गुण निराकार निराधार निशःकलंकी सत्य धनीदेव आदीपुरुष भैस नारायण त्यांच्या सच्च्या भक्तीवर प्रसन्न होवुन त्यांच्या बोलावर उभा राहत असे. ते सच्चे भक्तजन जेजे बोलत असे त्या बोलाप्रमाणे कार्य करत असे.

निराकार निराधार निश्कलंकी आदीपुरुष धनीदेवाची किर्त-महीमा व शिष्टाई चे मुळावरचे चतुर्पताचे ज्ञान सर्वसामान्य जनलोकांत असल्यामुळे तेथे सर्वत्र समसमान सत् कृतीची सत्भाव युक्त सच्च्या भक्तीची विश्व रंचना त्याकाळी पृथ्वीवर उत्पन्न झाली होती. पृथ्वीवरच्या या समसमान रंचनेमुळे तिरलोक्यातील तिरगुणी अवतार त्रिदेव सह त्रिगुणी मायादेवता ईत्यादी ला आपली किर्त महीमा वाढवुन सत्ता पृथ्वीवर स्थापण्याची शक्यता खुंटली आहे. हे जाणले होते. त्याचमुळे तिरगुणी शास्त्रांच्या बंधनासह तिरगुणी ज्ञान व तिरगुणी मायेचा फासा सर्वसामान्य जनांवर टाकुन तिरगुणी सत्ता स्थापण्याकरीता त्यांनी त्या मुळयवगाचा धनीदेव आदीपुरुष आदीरुपाची भाव धरुन प्रार्थना मांडली.

त्रिदेवांनी भाव धरुन मांडलेल्या प्रार्थनेला पावुन आदीपुरुष आदीरुपाने सर्व ज्ञान पिंडाचा गोळा एकत्र केला. त्या गोळयाला गाईचा आकार देवुन त्या आकारात चैत्यन्य ओतुन ती गाय स्वर्गावरत पाठवुन दिली. सर्व ग्यानपिंडाने बनलेल्या गाईने आपल्या आंगी असलेल्या ज्ञानपिंडांचा अमृत पान्हा वेळोवेळा चौघांना पाजु लागली. अधिक ज्ञान खंड०१/०२/ओवी-०३ गायत्री गाईची ओवी च्या निरसनातुन घ्यावे.

ती गाई गुप्त होवुन तिच्यापासुन अंती चार ज्ञान पिंड प्रकट झाले. हे चारही ज्ञानपिंड चौथ्या भैसा च्या पोटी गेलेत. हे ज्ञान पिंड मिळवण्यासाठी मायेन खेळ मांडला. परंतु तिच्या खेळाव्दारे त्या तीघांच्या हाती चौथ्याने कृपा करुन तिनच ज्ञानपिंड दिलेत. आणी चौथा ज्ञानपिंड पुढे येणा-या यवगाच्या कारणा करीता चौथ्याच्याच पोटी ठेवला/राहीला. ज्याव्दारे तो चौथा जागी होतो तो चौथा ग्यानपिंड चौथ्याच्याच हाती ठेवुन, बाकी तीन ज्ञानपिंड तिघांच्या हाती दिलेत. तेच तीन वेद होय. आणी हा चौथा चतुर्पता अथर्वन् वेद चौथ्याच्या पोटी ठेवला आहे.

तिघांपैकी ब्रम्हाने भैसामुखचे ते तिन वेद हाती घेतलेत. हाती आलेल्या तिन वेद-पिंडाचे त्यांनी उपासना, कर्म व ज्ञान असे तिन कांड केलेत. व चौथा कांड ज्यात तो ज्ञानपिंड चैत्यन्य मायेपर्यत पोहचुन तिथे चौथ्याचे ग्यान घेता घेता गोंधळला आणी नेती-नेती म्हणुन मागे फिरला. त्या चौथ्या कांड ला चौथा वेद संबोधुन त्या चौथ्या वेदाचे प्रवेशदर्शन देवुन तो चौथा वेद गुप्त आहे असे सर्वसामान्यात प्रेरित केलेत. आणी तिन वेद सह चौथ्या वेदाची प्रवेश पत्रिका च जनसागरात प्रेरीत केले.

या वेदात चतुर्वण व्यवस्था कर्मावर आधारीत होती ती अशी :

१. जो कोणी

- ब्रम्ह म्हणजेच निराकार निराधार सत्य देव जाणण्याचे कर्म हे सत्कृतीत राहुन करत असेल.

- किंवा त्याचे ज्ञान सत्कृतीत राहुन जाणण्याचा प्रयत्नरत् असेल.
- किंवा ज्यांनी सत्कृती व सच्ची भक्ती व्दारे ब्रम्ह थोडाबहुत जाणला असेल

तो थोडाबहुत ब्रम्ह जाणणारा ब्राम्हण वर्ग होय.

२. जो कोणी त्यांचे सरंक्षणाचे कार्य करत असेल. जो कोणी संरक्षक कर्मे करीत असेल तो क्षत्रिय होय.

३. जो कोणी धर्मतत्वांना आचरून सरळ साध्या मार्गाने सिदाईने उदिम-धंदा, व्यापार-व्यवसाय कर्मे करून उदरनिर्वाह करत असेल तो वैश्य होय.

४. जो मानवते विरूध्द अमानवीय निच कर्मे तसेच धर्म तत्वांविरूध्द राहुन अधर्मी कर्मे करत असेल तो शुद्र होय.

असे चार वर्ण पुर्वि वेदात कर्मावर आधारीत होते. परंतु त्या नंतर आलेल्या काही स्वार्थि विद्‌वान कवि कर्त्यांनीं स्वतःच्या उदरनिर्वाह व मानसन्मान, प्रतिष्ठा व सत्ता स्थापना ईत्यादी स्वार्थि हेतुकरीता स्वार्थि प्रवृत्तीने त्या निशंःकलंकी वेदांत स्वतःचेच श्लोक घुसडुन प्रेरीत केले.

स्वार्थि कविकर्ता व कथाकारांनी स्वःहीत साधण्याकरीता असे श्लोक प्रेरीत केले की : ज्या व्दारे ते मानसन्मान मिळवु शकेल. उदरनिर्वाह करू शकेल. जन्मानुसार चतुर्वण व्यवस्थाचे श्लोक टाकुन त्या व्दारे त्यांच्या पिढयानं पिढयांना मान मिळु शकेल. मग तो कितीही शुद्र कर्मे करो ना ! तरीसुध्दा तो ज्ञान, सत्ता हाती घेवुन त्या ज्ञानावर आपले वर्चस्व राखु शकेल. ईत्यादी अनेक स्वार्थि श्लोक त्या वेदांत घुसडवुन प्रेरीत करून, या स्वार्थि भक्तीवतांनी वेद नाशवले आहेत. गाउ काय या नाशीवंताची वाणी ? या नाशीवंतामुळे तिरभवनी नाश झाला हो ! याहीनं यवग नाशवले तिन्ही !

स्वार्थि नाशीवांने अश्याप्रकारे वेद नासवले आहेत. तिरभवनी नाश केला आहे. मुळयवगापासुन तिन यवगाचा नाश केला आहे. याची जाणीव चतुर्पती च्या जाणत्यांना होती. म्हणुनच जेवढी काळजी घ्यायची तेवढी काळजी कृष्णकालीन चतुर्पतीच्या जाणत्या गणांनी, संत मंडळीनी घेवुन हा वेद त्या काळी मौखिक ठेवण्याची सक्ती केली होती. कारण की :

- वेदांप्रमाणे या निशंःकलंकी मुळ-भागवता असलेला चतुर्पता अथर्वन वेदाची गत होवु नये.
- स्वार्थि नाशीवंताच्या हाती ही मुळभागवता असलेला चौथ्याच्या पोटचा चतुर्पता अथर्वन् वेद पडुन तो नाशु नये.
- त्यांच्या हाती तो कोणत्याही हालतीत पडु नये. तो त्यांच्या पासुन गुप्तच राहावा. दुरच राहावा.

या करीता त्यांनी हा चतुर्पता अथर्वन् वेद कृष्णकाळापासुन सात पिढयापर्यंत मौखीक ठेवण्याची सक्ती केली होती.

हे चतुर्पतीचे सर्व जाणते हेही जाणत होते की : मौखिक आवाजी गायन ठेवण्यात काही तृटी व तोटे आहे. ते असे :

१. जसे प्रतेक मानवाची श्रवण शक्ती, उच्चारण शक्ती व स्मरण शक्ती ही त्यांच्या प्रकृतिनुरूप वेगवेगळी व कमी जास्त राहत असल्यामुळे, कधी

कधी उच्चारण हे व्यवस्थीतपणे श्रवण न झाल्यामुळे शब्दात फरक पडु शकतो. शब्दांचा अपभ्रंस होवु शकतो. ओवीचे चरणे वर-खाली, कमी-जास्त होवु शकते.

२. प्रतेकाची स्मरण शक्ती कमी-जास्त असल्यामुळे कमी स्मरणशक्तीच्या मानवात चरणे विस्मरणात जावुन त्याच्याकडुन पुढील पिढींला ते चरणे देण्यास अडथळा येवु शकतो. चरणांचा क्रम वर खाली होवु शकतो. विचार शक्तींने त्यावर विचार केला नाही, तर ते तसेच श्रवण होत पुढे पुढे जावु शकते. कारण ईतर यवगाच्या मानाने या कलयवगात मानवांची शारीरीक शक्ती व मन मती बुध्दि व्दारे ग्रहण करण्याची शक्ती कमजोर आहे. धारण करण्याची शक्ती कमी झालेली आहे.

या तृटीतुन चतुर्पती नाम निशंःकलंकी राहण्यासाठी पुनाजी, हेंगडुजी, देवमनजी सह १८ खेत्री द्युतगण, जाणतेगण..ईत्यादी जाणत्यांनी पुढील उपाय योजना करून ठेवलीत.

१. हे नाम आकाशमात मध्ये निराकार निर्गुण पिंडात ओतुन कृष्णाजीने स्थापन केलेल्या सिधाई च्या सेनेच्या हवाली केलेत. या आत्मरूपी निर्गुण गादीवर चतुर्पता अथर्वन् वेद ग्यान भक्तीचे रोपन करून ते सैन्य कृष्णामुखच्या चतुर्पता अथर्वन् वेदावर बसवुन दिले.

अश्या रितीने आकाशमात मध्ये पुढील येणा-या पिढींकरीता निर्गुण निरंजन गादीवर हे निरंजन चतुर्पता ज्ञान व भक्ती बसवुन संरक्षीत करून ठेवले. सात पिढया नंतर येणा-या पुढील काळी चतुर्पता आथर्वन् वेदाचे ग्यान हे आकाशमात मधील सिदाईच्या चतुर्पता सैना, चतुर्पती कृष्ण अवधुत पंथाचे निर्गुण निरंजन ऋषि मुनी व द्युत.. ईत्यादी ॅव्दारे सच्या भक्त व भजनी गणांना दृष्टांत व गाही देवुन चतुर्पतीचे देणं देण्याची व्यवस्था करून ठेवली.

२. जे स्वतःच्या बोलावर उभे राहतात, अश्या तत्कालीन काही काही चतुर्पतीचे सच्चे भक्तयोगी, भजनयोगी, जाणतेगण यांना ओव्या लिहुन ठेवण्याची मान्यता दिली. परंतु हे लिखान सध्याच्या कृष्णकाळापासुन अंदाजे ३५० ते ४०० वर्षे पर्यत म्हणजेच सात पिढयापर्यत तत्कालीन स्वार्थि पंडीतांच्या हातात जावु न देण्याची काळजी घेण्यास सांगीतले. मायेच्या तिरगुणीं बाजारा पासुन लपवुन ठेवण्यास सांगीतले. स्वार्थि सत्ताधारी तिरगुणी पंडीतापासुन दुर ठेवण्यास सांगितले.

चतुर्पतीच्या जाणत्यांच्या नेमानुसार बाळाजी राजे यांनी पुनाजी कडुन लिखानास परवानगी घेतली. आणी जेवढया जमेल तेवढया काही ओव्या पुनाजी कडुन घेवुन चतुर्पती अथर्वन् वेदाच्या काही मुळावरच्या ओव्या ताम्रपत्रांवर मोडी लिपीत लिहुन ठेवल्यात. ते ताम्रपत्रे सात पिढयापर्यत कुणाच्या हाती लागणार नाही. अशी व्यवस्था करून ठेवली.

तर तिकडे जळगाव येथे संत बहिनाबाई उगप व तत्कालीन काही सच्च्या भजनी मंडळीनी हेंगडुजी महाराजाची परवानगी घेतली. जेवढया जमेल तेवढया ओव्या हेगंडुजी कडुन घेवुन त्या काही ओव्याचे लिखाण करून ते लिखाण सात पिढयांपर्यत कुणाच्या हाती लागणार नाही. याची व्यवस्था करून ठेवली.

तत्-कृष्णकालीन लिहुन ठेवलेल्या ओव्या हया सात पिढयानंतर येणा-या काळा करीता जपवणुक करण्यासाठी आहे. सध्याच्या तत्कालीन प्रचलीत कृष्ण काळाकरीता नव्हे !

याची जाण बाळाजी राजे यांना असल्यामुळे, त्यावर उपाय म्हणुन त्यानी तत्काळात गायनात आणण्या करीता, त्यांच्या जवळ जेवढया काही मुळ ओव्या आल्यात त्या ओव्यांची पलट केली. ते काही काही मुळ ओव्यांचे पलट करून ओव्यांचे गायन करू लागलेत. पलट ओव्यांव्दारे द्युतांचे स्तुतिगाण व चतुर्पताचे निरंजन ग्यान जनात प्रेरित करू लागलेत. बाळाजीचे पलट गायन अस्तित्वात आले.

काळ पुढे पुढे सरकत सरकत काळाने सात पिढया पार केल्यात. कृष्ण काळापासुन अंदाजे ३०० ते ३५० वर्षे नंतर **संत बहिनाबाई संस्थान जळगाव** याच्या कडे असलेल्या संत बहिनाबाईने लिहुन ठेवलेल्या ओव्या व ईतरत्र विखुरलेल्या ओव्या यांचा श्री शंकर लोखंडे उर्फ घंटी वाले बाबा यांनी आपल्या परीने जेवढा संग्रह होईन तेवढा संग्रह गावोगावी जावुन केला.

त्या थोडयाबहुत संग्रहीत झालेल्या ओव्या, कश्याही काही असेना ! त्या जश्याच्या तश्या ओव्या *‘अलामत रत्न भांडार अर्थात चतुर्पती भजनमाला’* या नावाचा गाथ्यात दिनांक ०२.०४.१९६५ रोजी वर्ष प्रतिपदा ध्वजा रोहणाच्या दिवशी प्रकाशीत केल्यात. त्यावेळी त्याचे मुल्य रू. ०१.५० पैसे म्हणजेच दिड रूपया होते. व सर्व हक्क ‘‘संत बहीनाबाई देवस्थान जळगाव’’ या संस्थेला स्वाधीन केले होते. श्री घंटीवाले बाबा यांचा जन्म ई.सन. १९३७ व निर्वाण दिनांक ०२.०८.१९८४ ला झाले. घंटीवाले बाबाच्या निर्वाणाच्या तब्बल दहा वर्षानंतर दिनांक ०२.०४.१९९४ रोजी बहीनाबाई संस्थान जळगाव यांनी आधीच्या पुस्तकातील ओव्या सह बाहेर निघालेल्या काही जुन्या ओव्या संग्रहीत करून त्या सर्व ओव्यांमधील जमेल तेवढे मुद्रण दोष काढुन *‘श्री अवधुत चतुर्पती भजनावली-चतुर्पती भजन भैसाचे’* या नावाची गाथा दिनांक ०२.०४.१९९४ ला प्रकाशीत केली. त्यांच्या आवृत्या ते प्रकाशीत करत आहेत.

काळ बदलला ! ओव्या कृष्णकालीन जाणत्यांनी ठरवलेल्या व्यवस्थे प्रमाणे बाहेर निघु लागल्यात. ओव्या नाही देणार ! नाही देणार म्हणणारे जुने भजनी गडी लोक त्यांच्या जवळ असलेल्या ओव्या देण्यास तयार झालेत.
या बाहेर निघालेल्या ओव्या तद्नंतर श्री यादव महाराज यांनी जसे जमेल तसे संग्रह करून प्रकाशीत करू लागलेत. त्यांनी ओव्यांच्या पुस्तकांच्या ११ आवृत्या प्रकाशीत केल्यात. ओव्या प्रकाशात येण्याचा काळ आलेला पाहुन इतरांना सुध्दा प्रेरणा मिळु लागली. इतरांकडुन छोटे-छोटे ओव्यांचे पुस्तके प्रकाशीत होवु लागलेत.

परंतु प्रकाशीत झालेल्या प्रतेक पुस्तकात ओव्यांबध्दल काही ना काही फरक होता. मुद्रण दोष होते. ओव्यांचे चरणे कुठे कमी, कुठे जास्त, कुठे शब्दबदल तर कुठे मुद्रण दोषांमुळे भलतेच अर्थ निघत होते. त्या त्या ओवीचे शब्दार्थ व निरसन नव्हते. पुर्णपणे चतुर्पता अथर्वन् वेदाचे ज्ञान खंड नव्हते. चतुर्पती अथर्वन् वेदाचे ज्ञानपिंड खंड माहीत नव्हते. सर्व काही अर्धवटच होते.

कृष्णकालीन मुळावरच्या ओव्या कोणत्या ? जुन्या ओव्या कोणत्या ? ओवींचे महात्म काय ? कोणत्या दांडातील कोणत्या ओव्या आहे ? कृष्णपूरीच्या नव्या ओव्या कोणत्या ? चतुर्पता निरंजन ग्यान चे ओव्याचा कोणता खंड आहे ? भाकल्या शकुन ज्ञानाचा खंड कोणता ? कायाज्ञानाचा खंड कोणता ?

ईत्यादी समजण्याचा कोणताही मार्ग नव्हता. त्याबध्दल थोडीबहुतही चर्चा नव्हती. एकच ओवी प्रतेक पुस्तकात थोडया थोडया फरकाने होती. एकाच ओवीचे चरण संख्या प्रतेक पुस्तकानुरूप वेगवेगळी होती.

पुस्तकातिल मुद्रणदोष व ईतर गोंधळा मुळे भजनी गणांच्या म्हणनीत वाद उत्पन्न होवु लागलेत. आमचीच म्हणणी योग्य व पुस्तकांतील अयोग्य ! किंवा पुस्तकांतील योग्य व तुमची म्हणणी अयोग्य ! अश्या प्रकारे दांडा-दांडातील म्हणणीवाले म्हणत कुठे कुठे वाद उत्पन्न करू लागलेत. परंतु त्या वादातित चरणांचे निरसन, अथवा संपुर्ण ओवीच्या चरणांचे निरसन, शब्दार्थ, चरणार्थ संदर्भ..ईत्यादीची गाही कोणी काही करून देत नव्हते. नुसतेच निरर्थक पोकळ वाद करू लागलेत. कारण की : त्यांनी ओव्या चतुर्पतीच्या जाणत्यांकडुन शब्दार्थ, चरणार्थ सह न घेता पुस्तकातुन घेतलेल्या होत्या.

शब्दार्थ, चरणार्थ व संपुर्ण ओवीचे निरसन, व चतुर्पती निरंजन ज्ञान व कृष्ण चरीत्र महीमा याची उणीव पडु लागली. परंतु एकही पुर्णपणे निरसन करणारे पुस्तक नव्हते. काही काही पुस्तके तर चतुर्पतीच्या शुध्द शंब्दाचे अर्थ माहित नसल्यामुळे त्या शुध्द शब्दांनाच अशुध्द ठरवणारे होते. मुळावरचे शुध्द शब्दांचा अर्थ न कळल्यामुळे त्यांच्या अंदाजाप्रमाणे जो अर्थ निघतो, त्याच अर्थाने ते मुळ शब्द बदलवणारे होते. त्याचमुळे कोणी निरसन करणारे, स्पष्टिकरन सांगणारे थोडेबहुत लोकही व्यवस्थीत समजावुन सांगु शकत नव्हते.

किर्तनकार हे ईकडचे तिकडचे जमा करून व काही आपल्या जवळचे टाकुन थोडेबहुत निरसन करून आपले किर्तन साधवु लागले होते.

चतुर्पताचे निरंजन ग्यानाची गाही सह संपुर्ण निरसनाची उणीव ज्ञानाच्या कमतरतेमुळे निर्माण झाली होती. ती चतुर्पताचे निरंजन ज्ञानाची उणीव भरून काढण्याच्या उद्देशानेच कळसुत्राच्या मालकाचा शकुन येवुन, तो आपणहुन आम्हा घरी येवुन, त्याने अहीनाघरचे ज्ञानांमृत पाजुन कृपा केल्याने, येथे निरसन करण्याचा थोडाबहुत प्रयत्न कृष्णकृपेने केलेला आहे.

कृष्णाजीच्या आमराईत/बागेत आलेले चतुर्पता मुळभागवता चे मुळस्तंभाचे हे फळ शेंडयावरचे आहे. कृष्णाजीच्या शकुनाने सतत १७ वर्षे खतपाणी घालुन या फळांचे गर वाढवले आहे. १७ वर्षानंतर आता हे शेडयावरच फळ तुम्हा हाती दिल्यावर कदाचीत काही जनांना एखादया ओवीरूपी फांदीला आलेले निरसनाचे फळाचा रस आंबट वाटु शकते. तर कुणाला तेच फळ गोड वाटु शकते.

ज्या कुणाला एखादया ओवीचे निरसन आंबट वाटत असेल, तर त्यांनी त्या ओवीरूपी फांदीवरचे त्या फळाची चांगली पारख करावी. व निर्णय घ्यावा की : त्या ओवीरूपी फांदीवर आलेले ते फळ दुर सारण्यालायक आहे ! की आपल्या जवळचा गोडवा त्यात घालुन ते फळ जवळ बाळगण्यालायक आहे !. हे त्यांचे त्यानीच ठरवुन निर्णय घ्यावा. तुम्हाला वाटलेले आंबट फळ दुर सारण्यालायक तुम्हास वाटत असेल तर, त्याला झिडकारू नका. त्याला बाजुला सारा !

कारण की : तुम्ही बाजुला सारलेले तुम्हाला आंबट वाटलेले तेच फळ ज्यांनी ‘‘साखरेची गोणी, लादाव या बैलावरी । आठवतो हरी सदोनित हो राया‘‘ असे विनवत विनवत त्यांच्या जवळ साखरेच्या गोणी जमा केलेल्या

आहेत. असे भक्तजन किंवा ‘‘साखरेचे आळ, लाभाव आम्हाशी । लक्ष्य पायापाशी सदोनित हो देवा‘‘ असे विनवत विनवत साखरेची आळ ज्यांनी जमा केली आहे. ज्यांच्या जवळ खुप गोडवा आहे. असे भक्तजन हे फळ सहजच उचलुन घेतीन. त्यात आपल्या जवळचा गोडवा टाकुन या फळाचाही रसपान घेवुन चांगला आस्वाद घेवु शकतो. तुम्ही बाजुला सारलेले दुस-यांच्या कामा येवु शकते.

प्रतेकांची बुध्दी व त्यानुरूप विचार करण्याची शक्ती वेगवेगळी असते. प्रतेकाचा पाहण्याचा दृष्टीकोण वेगवेगळा असतो. जशी ज्याची दृष्टी असेल, तसे त्याला जग दिसत असते ! ही दृष्टी त्यांच्या अंतःकरण व मनमती बुध्दी संस्कार तसेच भाव चित्त व भोवतालची परिस्थिती.. ईत्यादी वर अवलंबुन असते. त्याचमुळे सर्वच ओव्यांचे निरसन प्रतेकाला पटेलच असे नव्हे. ! कारण प्रतेकाचा बुध्दिसंस्कार व मनमती भाव प्रतेकाच्या प्रकृतीनुसार वेगवेगळा असतो.

प्रतेक जन आपआपल्या बुध्दीसंस्कार व दृष्टीनुरूप निरसनाला पारखेल. त्यापैकी काही पारखीं जनांना असेही वाटु शकते की : काही ओव्याच्या निरसनात कुठे कुठे पाल्हाळी लावलेली आहे. ते अर्ध सत्य आहे. पाल्हाळी लावण्याचा उध्देश हा आहे की :

- *‘चतुर्पती चा गडी कोणत्याही प्रकारच्या ज्ञानाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे मागे पडला नाही पाहीजे.*
- *चतुर्पती च्या गडयांना कोणत्याही प्रकारच्या आध्यात्मीक अथवा भौतीक ज्ञानाची कमतरता भासुन तो ईकडे तिकडे भटकु नये. त्याला सर्वप्रकारचे जास्तीत जास्त आवश्यक ज्ञान प्राप्त होवो.*
- *चतुर्पता गडयांना आवश्यक्य तेवढे सर्व ग्यान प्राप्त होवुन तो सर्वग्यान संप्पन्न व्हायला पाहिजे.‘*

याच कारणास्तव काही काही ओव्यांच्या निरसनात पाल्हाळी लावुन कुठे कुठे चरणांचे निरसन वाढवलेले आहे. उदाहरणार्थ निरंजना भरून गुणा, मुळस्तंभिचा पाया, पाचही तत्वे दयाहो मजला ईत्यादी ओवीच्या निरसनात पारखीला ज्ञानाच्या पाल्हाळी चे दर्शन होवु शकते.

काही जनांना असेही वाटु शकते की : काही काही ओव्यांचे निरसन सपुर्णतः चुकीचे आहे. चरणांचा दुसराच अर्थ काढला आहेत. चरणांचा मुळ अर्थ वेगळाच आहे. हे खरेही राहु शकते. कारण की : ही वाणीच चौरंगी आहे. या वाणीचे बोल चौरंगी आहे.

॥ चार वाणी चार खाणी चौरंगी जाणा ।
चौरंगाचं होय बोलनं । याच नातं सांगाना ॥ खंड०२/ओवी-२७

चौरंगाचे चौरंगी बोलन असल्यामुळे एका एका शब्दांचे एका एका चरणांचे चार चार अर्थ निघु शकतात. चौरंगाच बोल निघु शकते. अभ्यासु प्रतेक बोलाचे नाते सांगु शकतो. त्याचमुळे संपुर्ण ओवीचे सुध्दा चार चार अर्थाने निरसन होवु शकते. कुठे कुठे काही काही चरणांचा दोन दोन अर्थाने निरसनाचा अल्पशः प्रयत्न केलेला आहे.

या निरसनाचा अर्थ तुम्हाला कळला असेल तरच धारण करा. नसेल कळला तर ज्याला कळला त्या ग्यानीजनांला विचारा ! या निरसनात कुठे कुठे ज्ञान प्राप्त करण्यास अडचन वाटली असेल, तर ती अडचण चतुर्पतीच्या ग्यानीजवळ जावुन दुर करा. अडचनी दुर करण्यासाठी असतात धरून ठेवण्याकरीता नव्हे ! याची जाण ठेवा.

ज्यांना थोडयाच जाणीवेची गरज आहे. ज्यांना फक्त ईशाराच काफी आहे. असे समजदार तिक्ष्ण बुध्दिचे सुस्वभावी, विचारवंत, सत्कृत्य सत्गुणी गिण्यानवंत जनलोक या जगात या चतुर्पता भुम्मेवर इथे सुध्दा उभे आहेत. असे पलट चरणे गर्जुन सांगी करतात की : ।। या ठिकाणी हस्तक आहे श्री कृष्णाचे । या सागरात मेळ झाले महागंगेचे ।। खंड०७/ओवी-३९ अश्या या श्रीकृष्णांच्या ग्यानी हस्तकांना विनम्रतेने विचारा ! आपल्या जवळचे नाम रसरूपी अमृताचे रसपान तुम्हास करून हे निरसन चांगल्या रितीने समजावुन उमजावुन देतील.

चतुर्पती चे देणं असलेल्या जाणत्यांकडुन मुळावरच्या एक एक ओव्यांचे संकलन करून घेत, त्यां जाणत्यांच्या कडुन शब्दार्थ व चरणार्थ सह ओवी समजावुन घेत त्यांचे देणं प्राप्त करत एक एक ओव्यांचे एका एका अर्थानं निरसन करण्याकरीताच आयुष्याचे १७ वर्षे लागुनही ब-याच काही ओव्यांचे निरसन राहीलेच. तर मग चार चार अर्थाने निरसन करत बसलो, तर हे आयुष्यच कमी पडते. याची चांगली जाण कृष्णकृपेने आम्हाला आहे. त्यासाठी पुनःश्च जन्मे घ्यावे लागेतील. पुनःश्च जन्मे घेण्याची ईच्छा या कृष्णानं मोक्षाचा मार्ग दाखवुन मुळापासुन उपटुन टाकली आहे.

आमच्याच्यान जोवर होईन तोवर आम्ही या जन्मी कदम कदम बढत, भजन पुजंन ध्यान सुमरन गायन करत राहीलो. प्रपंच करून परमार्थ साधत या चतुर्पती हरी नामी राहुन, धिराईने व सावधतेने चालत चालत राहीलो. जे काही आमच्या हाती देणं लागलं, ते मिळवत चतुर्पता नामी मार्गक्रमण करत चालंलो. आणी जेवढ काही आमच्याच्यानं चालंता येईल, तेवढं चालुन चालुन शेवटी शिणलो आहोत. कारण की : शंभर वेळा तोडु केली तरी ही चतुर्पतीची सुपारी तशीच झाडावर लटकतांना दिसत आहे. चतुर्पती हरीला भजता भजता चतुर्पतीचे निरसन करता करता थकुन जावुन शिण येवुन आमच्या खांदयावरच निरसनाचे खाणस-ज्यु बाजुला टाकुन दिलेले आहे. भाररहीत मुक्त पणे संचारत चतुर्पता नामी नित राहुन चतुर्पतीचे भजन पुंजन ध्यान सुमरन करत आनंदा व्दारे चतुर्पता अथर्वन् वेद सैन्य निर्गुण गादीवर आनंदाने बसवण्याच्या कृष्णानंदाच्या यवगाच्या कार्यात, खारीप्रमाणे थोडेबहुत सहभागी होवुन, या बिर्दाचे काम सदा आनंदाने करत राहण्याचे, कृष्णाकडे आता नित विनंती अर्ज करत आहोत. आता तुम्ही ते निरसनाचे खाणस-ज्यु घेवुन बाकी राहीलेले ओव्यांचे अनेक अर्थांचे निरसन तुम्ही तुमच्या बुध्दी प्रमाणे करण्याचा प्रयत्न करावा. हीच कळकळीची विनंती.

या ओवीरूपी फांदीवर आलेल्या या निरसनाचे फळांची पारख अवश्य करावी. आम्हालापण सच्चे पारख करणारे पारखीच पाहीजे आहेत. कारण हे सच्चे स्वतःची ओळख करून घेतलेले ओळखीचे आत्मज्ञानी पारखीच ओळखतीन आत्म जीव ! असे ओळखीचे ओळखतीन जीव. असे जग ओळखेना ओवीचे हे चरण गर्जुन सांगी करते.

म्हणुनच पुनश्चः विनंती करतो की : सच्चा पारख करून घेणाराच पाहीजे. कारण की : त्या पारखीने स्वतः ला पारखुन स्वतः आत्मज्ञानी होवुन स्वतः ला तर ओळखलेले आहे. असेच स्वःस्वरूपाची ओळखी करून घेतलेलेच ओळखीचे ओळखतीन हो जीव ! अनोळखी बहु मानवाचे वाटते गा भेव ! ज्यां आत्मज्ञानी भक्त जनांना त्या चतुर्पतीने निरंजनी भेटी दिल्या आहेत. मुजरा घेतला आहेत. ज्यांना कृष्ण प्रकाश लाभला आहे. अश्या भेटी आंगच्या सिध्दगणांना या चरणाव्दारे आम्ही विनविती की :

॥ भेटी आंगचे सिध्द उभे । राहावं आमच्या संगतीला ।
सदा विनवितो नित साहयं । करावं आम्हाला ॥ खंड०२/ओवी-३७

काही जनांना त्यांच्या बुध्दी व दृष्टी नुसार काही ओव्यांच्या निरसनामध्ये तिरगुणी ग्यान आहे. असे वाटु लागेल. परंतु हे तिरगुणी ज्ञान होय काय ? तिरगुणी ज्ञान म्हणजे काय ? तिरगुणी ज्ञान व चतुर्पती ग्यान कशाला म्हणावे ? तिरगुणी ग्यान व चतुर्पती ग्यान यात फरक काय आहे ? याची त्यांनी अवश्य पारख करून घ्यावी. आमच्या मते तर...

**तिरगुणी ज्ञानः-**

तिरगुणी ग्यान म्हणजे :

- तिरगुणी मायेच्या रज, सत्व, तम या तिरगुणांचे राजे असलेले अनुक्रमे ब्रम्हा विष्णु महेश आणी तिरलोक्याचे तिरगुणी अवतार देवी-देवता यांची स्तुति व महीमा पुजा-पाठ मुर्तिपुजा व्रत-वैकल्प वाढवणारे कर्मकांड असलेले सत्व रज तम गुण युक्त ज्ञान.
- तिरगुणी देवतांची किर्त महीमा वाढवण्यासाठी प्रेरीत केलेले स्तुतिगाण, कथासार, व्रत-वैकल्य, मुर्तिपुजा, कर्मफलांच्या आशेने युक्त असलेले कर्मकांड ईत्यादी स्वतःव्दारे स्वतःची महिमा पुजा-अर्चना आदर-सत्कार प्रेरीत करून स्वतःची सत्ता गाजवणारे ग्यान.
- मानसन्मान पुजा-अर्चना आदर-सत्कार ईत्यादी ची अभिलाषा बाळगुन असलेले तिरगुणी गुरू व्दारे दिलेले पोटपुजेसह मानसन्मान मिळवणारे तिरगुणी कर्मकांडाचे ज्ञान.
- कल्पना म्हणजेच माया ! या मायेचा संग करून मानसन्मान व पोटपुजेसाठी घुसवुन दिलेले काल्पनिक पर लावलेले ग्यान.

हे सर्व तिरगुणी ज्ञान होय.

**चतुर्पती ग्यान :-**

चतुर्पता ज्ञान म्हणजे :

- तिरगुणी मायेने रंचलेले कपट व असत्य दाखवुन, या तिरगुणी मायेच्या तिरगुणांच्या पलीकडचे सत्याकडे लक्ष्य वेधुन या तिरगुणांच्या पल्याड उभा असलेल्या चतुर्पती परमात्मा आणी त्याचा तेजोगुणी अंश असलेल्या आत्मा याबध्दलचे निश्कलंकी निरंजन ज्ञान म्हणजे चतुर्पता ज्ञान होय.
- म्हणजेच ज्या ग्यानाने तिन गुणांचे तिन राजे यांच्या पलिकडे उभा असलेल्या चौथ्या चतुर्पती परमात्माची ज्ञानसंपंन्न भेट होवुन मायेच्या भ्रांतीचा भेद उडतो. कल्पनेच्या म्हणजेच मायेच्या म्हणजेच कल्पनेच्या पालव्या तोडुन मायाविरहीत असलेले निरंजन ज्योतीचे निरंजन ग्यान प्रकट होते. सत्य ज्ञान भक्तीबीज दिसते. हद्‌यात सोहंम् बिजाचा प्रकाश पडतो. पिंडी-ब्रम्हांडी ऐक्य होवुन ब्रम्ह म्हणजेच निराकार निराधार ज्ञानदृष्टीत येतो. तिरगुणांच्या पल्याड उभा असलेला चौथा निराकार निराधार निशंःकलंकी सोहंम् निरंजन चैत्यन्य ज्योर्तिमय आदीपुरूष भैस दृष्टीक्षेपात येतो. त्याचा प्रकाश लाभुन देह-आत्मा जागृत होतो. यश, श्री, औदार्य, ज्ञान, विज्ञान, दया, क्षमा, शांती, माया-ममता, क्रिया, करूणा प्राप्त होते. पर व परमेश्वर दिसते. पंचम शुन्य दिसते. त्याचे सुमरन म्हणजे स्मरण येवुन आत्म स्मृति ची प्राप्ती होते. देणं मिळत राहते ! ते ग्यान म्हणजे चतुर्पती ग्यान होय.

- ज्या ग्यानाने आत बाहेर चैत्यन्य दिसुन निरंजनी बोधाने आत्मग्यान व निरंजन ग्यान पिंडे प्राप्त होते. तिरगुणी मायेच्या पलीकडचे त्रिगुंणांतीत असलेले चतुर्पती परमात्मा चे ग्यान देत देत चौथी अवस्था प्रकाशमान करते. सच्ची ज्ञान-भक्ती देते. ते चतुर्पता ग्यान होय.
- परमात्माच्या अंशाला पकडुन परमात्मापर्यंत पोहचण्याचे ग्यान. म्हणजेच परमात्माच्या तेजोगुणी अंश असलेल्या निर्गुण निरंजन आत्माला जाणुन चौथ्या चतुर्पती निराकार निरंजन परमात्मा पर्यत पोहचण्याचे मार्गोपदेश, योगज्ञान, देह-जीवांचे ज्ञान, कायाज्ञान, आत्मज्ञान, चतुर्पती निरंजन ग्यान, मुळावरचे ज्ञान, मानव निती धर्म, सिदाईचे ग्यान, भाकल्या शकुनाचे ग्यान, सत्कृत्याचे ज्ञान ईत्यादी मुर्तिपुजा व कर्मकांड व्रत-वैकल्पे विरहीत ग्यान म्हणजे चतुर्पता ज्ञान होय. तसेच स्वतःव्दारे स्वतःची किर्त महीमा वाढवणारे ज्ञान विरहीत ग्यान म्हणजे चतुर्पता ग्यान होय.
- तिरगुणांचे ओझे टाकुन चौथ्या शुध्द सत्वाच्या अधिक्य वाढवण्याकरीता सत्कृत्याकडे लावुन, सत् च्या अधिक्याचे संचय करत त्यातुन शुध्द सत् काढत त्या शुध्द सत्व चे सार हंसरूपी आत्म्याला पाजणारे ग्यान म्हणजे चतुर्पता ग्यान होय. आत्म्यावरचे विषय-वासंनांचे वेस्टने धिराईने काढुन त्या आत्म्याला निश्कलंकी व प्रकाशीत करण्याचे देहीचे व जीवाचे ग्यान म्हणजेच निरंजन आत्मग्यान देणारे ज्ञान म्हणजे चतुर्पता ग्यान होय. तसेच देहे-जीवाच्या उन्नत्ती साठी आत्माला जागवण्यासाठी केलेले आत्मोपदेश, निरंजन ग्यान भक्ती ईत्यादी चे ग्यान म्हणजे चतुर्पता ज्ञान होय.

हेच सर्व ग्यानाच्या पल्याडचे चौथ्या तुर्या अवस्थेत प्राप्त होणारे निरंजन **चतुर्पता ग्यान** होय.

हे तुरीया म्हणजे चौथ्या अवस्थेतील चतुर्पती ग्यान ज्याला प्राप्त झाले, तो तिरगुणांचे देवी-देवता व त्यांची महीमा वाढवणारे कर्मकांडे, पुजा-पाठ, व्रत-वैकल्प जंतर-मंतर यांच्या मागे लागत नाही. तो चतुर्पता निरंजन ग्यानाने आत्मग्यानी होवुन परमात्याच्या अंशाला पकडुन सरळ सरळ एकला असलेल्या चतुर्पतीलाच मनभाव सद्भाव भक्ती करत भजतो. तो जाणतो त्या एकाला जाणताच सर्व काही जाणले जाते. सर्व वेद पुराण कुराण बायबल या एकाचेचे आहे. चार वेद सहा शास्त्रे अठरा पुराणात या एकाचेच स्तुतिगाण तिरगुणीं कविकर्त्यानी आपआपल्या तिरगुणी देवतांचे नामे समोर करून केलेले आहेत. त्या एका पासुन दुर गेल्यास सर्व काही दुर जाते.

कारण की : त्या एकापासुनच तुम्ही सर्वत्र जुळल्या गेलेत आहात. त्या एका पासुनच सर्वत्राचा उगम आहे. सर्वत्र अंती त्या एका मध्येच विलीन होणार आहे. अश्या त्या एका कडे पाठ फिरवुन मायेच्या तिरगुणी संसाराकडे दृष्टी ठेवुन पाहील्याने काहीही प्राप्त होणार नाही. परंतु तिरगुणी माये कडे पाठ फिरवुन तिरगुणांच्या पल्याड उभ्या असलेल्या त्या एकाकडे दृष्टी वळवल्यास, तो एक आपणहुन तुम्हा घरा येवुन तुम्हा हाती धरून तुम्हास वेळोवेळा जे पाहीजे ते सर्व काही प्राप्त होण्यास नित साहय करत राहील. आकाशवाणीचा हा शिकविता धनी तुम्हा जवळी उभा राहील. या धन्या संग तुमची तार जुळेल.

या व्यतीरीक्त ईतर तिरगुणी ज्ञानी व जे आत्मज्ञान विसरले, ते आकाशवाणी चा धनी चतुर्पती ला विसरले. ते सर्व तिरगुणी जन तपे, व्रते,

तिर्थे, पुजा-पाठ, कर्म-कांडाच्या उपासना, मुर्तिपुजा, जप-तप व तिरगुणी अवतारांची व स्वतःच्या व्दारे स्वतःची अथवा स्वतःच्या आवडत्या तिरगुणी देवतांची किर्त-महीमा वाढवणे ईत्यादी मार्गाला लागले आहेत. त्याकरीता ते नवविध धर्म रंचत आहेत. या मुळेच हे लोक तिरगुणी माया-धर्मात बांधले गेलेत. असे तिरगुणीमय माया-धर्म चालवत असतांना ते आत्मग्यानासह चौथ्याला विसरले. चतुर्पतीचे निरंजन ग्यान विसरले. आणी मायेने टाकलेल्या तिरगुणी बंधनात पडलेत.

तिरगुणी मायेच्या मायावी मोहनी व्दारे त्यांच्यावर मायेची भ्रांती, भ्रम व भुलवन पडली. तिरगुणी मायेने त्यांना मधुपानाप्रमाणे पाजलेल्या आपल्या तिरगुणी ज्ञानाचा प्याला ची धुंद चढुन ते मायेच्या भुलवणीच्या धुनीत गोयल्या गेलेत. स्वतःच्या देहीच्या निरंजन धन्याला विसरून गेलेत. आणी तिरगुणी मायेच्या तिरगुणी ज्ञानाचा प्याला हाती घेवुन त्यांनी तिरगुणी मायेने खोदलेला अधोगतीचा मार्ग धरला. तिरगुणी मायेच्या अधोगतीच्या मार्गात पडल्यानंतर हे सर्व तिरगुणी लोक आपल्याच धर्माला थोर संबोधुन षटकर्मे चा आरंभ मोठया अभिमानाने करू लागलेत.

हे तिरगुणी सर्व ३३ कोटी देवांना भजुन मोक्ष मागतात. परंतु त्यांना हे माहीत नसते की : त्रिदेवांसह या ३३ कोटी तिरगुणी देवांनाच तर मोक्ष मिळाला नाही, तर ते तिरगुणी देव यांना मोक्ष कुठुन देणार ?

जे तिरगुणी देव व त्यांचे तिरलोकी अवतार जन हे या तिरगुणी भक्तांच्याच कडुनच भक्ष्य मागतात. नवस घेत त्याच्या भक्तांनाच काहीतरी मागतच राहतात. ते देव यांना काय देवु शकणार ? निष्काम भक्ती करण्यास कसे सांगु शकेल ?

देणारा वेगळा निराळाच केवळ एक ! आणी त्यां एकल्या एक चौथ्या परमात्मा च्या देण्याचा मान घेवुन सत्ता गाजवणारे हे तिरगुणी देव ! हेच सत्य या तिरगुणींना माहीत नाही !

हे सत्य जरी तिरगुणी मायेची झापड असलेले तिरगुणी जगाला कितीही सांगीतले, तरी हे तिरगुणी जग या चतुर्पतीला काही केल्या ओळखेना ! हाच चतुर्पती देव भरण देही ! हे कितीक सांगतले तरी काही केल्या कोणी ऐकत नाही. हे तिरगुणी जग ओळखेना ! सांगतो गाही कोणी ऐकेना !

म्हणुनच कबिर जसा या तिरगुणी दुनियेला सयाना/शहाणा ची पदवी देवुन स्वतःला पागल, दिवाना घोषीत करतो, तसेच आम्ही सुध्दा या तिरगुणी दुनियेला अती शहाणे ची पदवी देवुन स्वतःला उलटे पागलच घोंषीत करतो.

कारण की : या मायेव्दारे अंधंकारात पडलेल्या तिरगुणी जगतात सत्यज्ञान सांगणा-याला पागल मानले जाते. तर असत्य व मुढं ग्यान सांगणा-याला ज्ञानी मानल्या जाते. ज्यांना काहीच माहीत नाही. ज्यांनी फक्त शब्दांचा कचरा कुटार जमा केलत. आणी आपल्या खोपडी मध्ये शास्त्रे भरून ठेवलेत. कोरडे ग्यान भरून ठेवलेत. तेच या तिरगुणी जगतात ज्ञानी समजले जातात. ज्यांच्या जवळ शब्दांचे जाळे आहेत. वेद उपनिषद पुराण कंठस्थ आहेत. तेच या तिरगुणी जगतात पंडीत समजल्या जाते. तेच निष्णांत मानले जातात. तेच तर्क करण्यात तर्कि आहेत. असे या तिरगुणी दुनियेत मानतात. ऐसे या तिरगुणी जगातातील सर्व त-हेचे मुढं असलेले तिरगुणी जन हे सत्य

सांगणा-या ख-या ज्ञानीला पागल ठरवतात. आणी असत्य सांगणा-या ढोंग्यांना प्रतिष्ठीत ज्ञानी समजतात.

म्हणुनच शुकदेव या तिरगुणी मायेच्या बंधनात टाकणा-या या तिरगुणी जगतात प्रवेश करण्याच्या भयाने घाबरत घाबरत १६ वर्षे मातेच्या उदरातच राहीला. आणी बाहेर येवुन ही तिरगुणी दुनियाला त्यागुन सरळ जंगलात वास्तव्यास गेला. तिन सोडुन चौथ्या मार्गि लागला.

तर कबिर स्वतःला म्हणु लागला की : कहे कबिर दिवाना । ये दुनिया एक सयाना/शहाणा । मै ही एक पागल दिवाना.. । कारण की : या तिरगुणी दुनियाचे बहुमत आहे. तिरगुणी मायेच्या अंधंकार कोठडीत राहणा-यांनी सत्य प्रकाश कधिही पाहीला नसल्यामुळे, त्यांना कितीही सत्य सांगीतले, प्रकाशाचा मार्ग दाखवला तरी ते मानत नाही. कारण की : त्यानां या मायेच्या अंधकारात राहण्याची सवय पडली आहे. मायेच्या अंधा-या कोठडीत अंधःकारात राहणा-या या तिरगुणी दुनियाने चौथ्या धनीदेवाचा प्रकाश कधीही न पाहील्यामुळे चौथा प्रकाश मार्ग दाखवणा-यालाच ते बहुसंख्यने असलेले तिरगुणी अंधकारी बहुमताने पागल ठरवतात.

अंधंकारी जनांला फक्त अंधाराची आदत पडल्यामुळे ते फक्त अंधार व अंधाराची छाया जाणतात. त्याचमुळे ते सर्व या 'चौथ्या धनीदेवाच्या निरंजन प्रकाश चे अस्तित्वच नाही आहे' असे म्हणतात. व एकमेकांना दुजोरा देतात.

कारण की : त्यापैकी काही जाणत्या तिरगुणींना याची जाण आहे की : या चौथ्याच्या निरंजन प्रकाशाचे अस्तीत्व मानल्याने तिरगुणी मायेव्दारे आपल्याला फसवुन बांधल्या गेले. असे सिध्द होते. आपली फसगत होवुन मायेच्या अंधकारात मायेला चोपडत राहीले. आपण मायेव्दारे फसवल्या गेलो. मायेत फसुन आपले जिवन व्यर्थ वाया घातले. ईत्यादी सिध्द होते. मायेत राहुन त्यांनी आजपर्यंत जे आयुष्य जगले ते व्यर्थ ठरल्या जाते. आपणच मुर्ख पागल ठरवल्या जाईल. या भितीने निरंजन कृष्ण प्रकाशाचे सत्य सांगणा-याला एकल्याचे ते जाणुनबुजुन ऐकत नाही. तिरगुणी मायेने आपल्या अंधा-या कोठडीच्या अंधकारात टाकलेले अंधकारी स्वार्थि तिरगुणी जन हे बहुमताने असल्यामुळे ते सर्व त्या प्रकाश मार्ग सांगणा-या एकल्यालाच हिनवत हिनवत पागल ठरवते.

म्हणुनच कबिर स्वतःला पागल म्हणवुन घेतो. म्हणुनच आम्हीपण स्वतःला उलटे पागल म्हणवुन घेतो. म्हणुनच शुकदेव या तिरगुणी मायेच्या अंधकारी जगतात येण्यास भितो. व बाहेर आल्यावर या अंधकारी तिरगुणींचा पदर न लागण्यासाठी यांच्यापासुन दुर जंगलात पळुन चौथ्या मार्गि अरण्यात लपुन राहतो. म्हणुनच चतुर्पतीचे ओवी चरणे गर्जतात की : हे तिरगुणी जग ओळखेना ! सांगतो गाही कोणी ऐकेना ।

त्याचमुळे अश्या तिरगुणी दोहीत ठेवणा-या बहु मानवाचे वाटते भेव ! कारण की : हे अंधकारी तिरगुणी जनलोक हे चतुर्पतीचं चारही वाणीतुन निघालेले मौंस वाणी चे रसपान हे तिरगुणी मायेने मधुपानाप्रमाणे पाजलेल्या तिरगुणी ज्ञानांच्या प्याल्यात टाकुन करतील. आणी या चतुर्पतीच्या मौसवाणीला बेईमान होवुन स्वतः चे हीत हे तिरगुणी स्वार्थिजन साध्य करुन घेतील.
म्हणुनच अश्या या अंधकारी तिरगुणी मानवांपासुन ही चतुर्पती दुरच असलेली बरी ! तिरगुणी राज सह तिरलोक्यातील तिरगुणी अवतार यांच्या पासुन ही चतुर्पती चौथ्याने आधीच आपल्या पोटी ठेवुन यांच्यापासुन दुरच ठेवत आलेला

आहे. स्वार्थि सत्तालालची तिरगुणी पासुन ही चतुर्पता दुरच गुप्त ठेवण्याचा प्रयत्न चतुर्पतीच्या जाणत्यांनी केलेला आहे. करत आहे. पुढेही करत राहणार !

ज्यांचे काहीतरी पुर्व जन्मांचे व या जन्माचे संत्कृत्याच संचीत जडले आहे. ज्यांनी पुर्वजन्माचे सत्कृतीचे संचित जागृत केले आहे. अश्यांच सच्च्या भक्त भाग्यवंताच्या हाती ही चतुर्पता लागेल. अशी व्यवस्था कृष्णा सह सर्व चतुर्पतीच्या जाणत्यांनी आधीपासुनच करून ठेवलेली आहे. असो.

कृष्णाजी महाराज यांच्या सांगीवर आधारीत असलेल्या चतुर्पता अथर्वन् वेदांच्या ओव्या अंदाजे ई.सन. १७०० साल च्या अगोदर पासुन आवाजी येत येत आजपर्यंत आल्या आहेत. कृष्णकाळातील व-हाडी बोलीभाषा व त्यांचे गायन, उच्चार ईत्यादीचे वैशिष्टे लक्षात यावीत. त्यांची मुळ अवस्थेतच शक्य तो जपवणुक व्हावी. म्हणुन नविन लेखन नियम व व्याकरणाप्रमाणे बोलीभाषेची दुरस्ती न करता ते जुने व्याकरण जसेच्या तसे ठेवण्याचा शक्यतो प्रयत्न केलेला आहे.

जीथे आवश्यकता वाटेल तिथे जुने शुध्द बोलनं असलेले शब्द जसेच्या तसे ठेवुन त्याचे पर्यायी नवे शब्द दिलेले आहेत. आवश्यकता वाटल्यास गुंढ शब्द, आजच्या पिढीने कानी न ऐकलेले शब्द, जुने लुप्त झालेले शब्द ईत्यादीचे स्पष्टीकरण सह अर्थ दिलेले आहेत.

तुम्ही तुमच्या भागातील बोली भाषा प्रमाणे तुमच्या म्हणणीत जुन्या उच्चारांचे नविन उच्चारां प्रमाणे उच्चारण करून गायन करु शकता. परंतु जुन्या उच्चाराच्या शब्दातुन जसे चौरंगी अर्थाचे बोध निघतात, तसे नविन उच्चाराने निघनेच याची काही खात्री नाही.

उदाहरणार्थ :-

१. जसे *''त्याहीचे''* या उच्चाराऐवजी *''त्याचे''* असा उच्चार तुम्ही तुमच्या बोली भाषेप्रमाणे करु शकता. परंतु हे उच्चार बदल करतांना याचे अवश्य ज्ञान तुम्हास असले पाहीजे की : *''त्याहीचे''* हा उच्चार दृढता दर्शवते तर *''त्याचे''* हा उच्चार शंकास्पद अर्थ दर्शवते. जसे 'नागाजुन *त्याचे* नाव !' असा उच्चार केल्यास नागार्जुण हे कोण्यातरी निर्जिव स्थळाचे नाव राहु शकते. किंवा सजिव प्राण्याचे नाव राहु शकते. असा सजिव या निर्जिव ? असा शंकास्पद अर्थबोध निघतो. तर 'नागार्जुन *त्याहीचे* नाव' असा हा उच्चार स्पष्टपणे दर्शवते की : नागार्जुन हे कोण्यातरी सजीव प्राण्याचे नाव आहे. ते कोणत्याही हालतीत ते निर्जिव वस्तु अथवा ठिकाणांचे नाव नव्हे. हे निश्चित आहे. यात कोणतीही प्रकारची शंका नाही.

२. जसे *''परवेशी''* या उच्चाराऐवजी *''प्रवेशी''* हा उच्चार तुम्ही तुमच्या बोली भाषेप्रमाणे करु शकता. परंतु *''प्रवेशी''* हा उच्चार एकच अर्थ दर्शवते ते म्हणजे प्रवेश करणारा ! परंतु *''परवेशी''* हा उच्चार दोन पेक्षा जास्त अर्थबोध देवुन चौरंगी होतो. *परवेशी* म्हणजे *पर+वेशी* !.*पर=दुस-या, मायेच्या* + *वेशी = येश,सिमा* म्हणजेच दुस-या वेशीवरून आत आलेला. मुळ घराची वेश ओलांडुन दुस-या वेशीवर प्रवेश घेणारा प्रवेशी. आत्मा आपल्या परमात्माच्या . मुळ घर ची वेश ओलांडुन, या प्रकृतिमायेच्या येशीच्या आत प्रवेश घेवुन होणारा प्रवेशी जीव ! ईत्यादी चौरंगी अर्थ *परवेशी* उच्चाराने निघु शकते. असो.

३. जसे *'राहो'* या शब्दाचा उच्चार ऐवजी *'राहावे'* असा उच्चार तुम्ही तुमच्या बोलीभाषेप्रमाणे करू शकता. परंतु *'राहावे'* हा उच्चार एकच अर्थ दर्शवते. तर *'राहो'* हा उच्चार एकपेक्षा जास्त अर्थ दर्शवत चौरंगी होतो. ***राहो*** म्हणजे येथे येवुन राहावे. व राहो म्हणजे देहीत राहुटी करून राहणारा निश्कलंकी राहु आत्मे येथे येवुन उभे राहो. उदाहरणार्थ :- *// 'तिन यवगं भ्रांत पडली, नाही झाले दर्शन । भैसराज महाराज उभे राहो येवुन' //* या चरणात दुस-या टुकीचा अर्थ चौरंगी होते. ते म्हणजे तिन यवग तिरगुणी मायेची भ्रांत पडल्यामुळे दर्शन झाले नाही. म्हणुनच आता 'भैसराज महाराज तुम्ही येथे उभे रहावं व आम्हास दर्शन दयावे' आणी दुसरा अर्थ 'भैसराज महाराज तुमच्या दर्शनाकरीताच हे राहु आत्मे देहीत परवेशी होवुन येथे तुमची दर्शनाची वाट पाहत हे राहु आत्मे म्हणजेच राहो उभे आहेत'. अश्या रितीने *राहो* हा शब्द चौरंगी होतो.

त्याचमुळे जुन्या उच्चाराचे शब्द जसे चौरंगी व मंत्राप्रमाणे काम करतात, तसे काम नविन उच्चाराने उच्चारलेले शब्द करेलच याची काही शाश्वती नाही. काही जमानत नाही. काही खात्री नाही.

कारण की : ही वाणीच मंत्रवत् रंचणेत रंचलेली असुन चौरंगी अर्थाची आहे. मंत्राप्रमाणे फल देण्यासाठी कुठे कुठे मंत्राप्रमाणे शब्दरंचना करून पंचतत्व गायन कला व्दारे गायन केलेली आहेत. पंचतत्व गायन कला ची माहीती परीशिष्टात दिलेली आहे. अधिक ज्ञानासाठी ते परिशिष्ट वाचावे.

काही काही ओवींचे काही काही चरणे हे मंत्राप्रमाणे कार्य करतात. ते चरणे काही चतुर्पतीचे जाणते कधी कधी मंत्राप्रमाणे कुठे कुठे वापरतात. म्हणुनच तुम्ही तुमच्या गायन म्हणनीत शब्दबदल, उच्चारबदल, ओळबदल, करतांना याची जाणीव ठेवावी की : मुळ शब्दाचा-चरणांचा-ओवीचा जो मुळ गाभार्थ आहे. जो मुळ अर्थ आहे, त्या मुळ अर्थाचा बेअर्थ होणार नाही. पंचतत्व गायन कला बिघडुन त्या चरणांचा प्रभाव कमी होणार नाही. याची अत्यंत काळजी घेण्यात यावी.

विनाकारण जबरदस्तीने, नविन चालीत बसवण्याकरीता नवीन शब्द टाकुन त्या शब्दाला लांबवणे. अति लांबवुन लयीत म्हणणे. किंवा नविन चालीत बसण्यासाठी एखादा शब्द गाळुन टाकणे. शब्द बदलवणे. असे करू नये. कारण तुम्ही गाळलेला किंवा बदलवलेला शब्दच जर पंचतत्व मंत्रवत उच्चारात मोलाचे कार्य करणारा असला, तर त्या चरणांची सर्व शक्तीच वाया जाईल.

म्हणुनच याची जाणीव ठेवावी की : तुम्ही गाळलेला शब्द हा पंचतत्व उच्चार रंचणेत मंत्रवत कार्य करणारा राहु शकतो. म्हणुनच "ठेका चुकला तरी चालेल परंतु शब्द गाळु नये !" हा जुना नेम बाळगावा. ही कळकळीची विनंती.

काल प्रवाहामुळे काही काही ओवीतील चरणे विखुरली गेली आहेत. तर काही ओवीचे चरणे कमी-जास्त किवां गहाळ झालेले आहेत. त्याचमुळे ज्या काही गायन म्हणणीमध्ये, चतुर्पतीच्या दांडा-दांडामध्ये काही काही ओवींचे चरणे जास्तीचे आहे. ते जास्तीचे चरणे जिथुन कुठुन मिळेल, तेथुन आणुन *"माझ्र मजला गोड रे बापा ! कस टाकु या चरणांना !"* असे म्हणत म्हणत या चतुर्पता अथर्वन् वेदात समावीष्ट केलेले आहेत.

चतुर्पता अथर्वन वेदात दिलेल्या ॥ मुळावरची ओवी ॥ या शिर्षकाखाली असलेली ओवी ही कृष्णकालीन असुन ती कृष्णकृपेने चतुर्पती च्या भैटी आंगच्या नामीक अनामीक जाणत्यांकडुनच निरसन काळच्या सतरा वर्षात शब्दार्थ चरणार्थ सह देणं स्वरूपात २०१७ च्या पुढंच्या काळात देण्याकरीता आम्हास प्राप्त झालेल्या आहेत.

तर ॥ सावंगा-जळगाव दांडाची मुळावरची ओवी ॥, तसेच ॥ जळगाव दांडची मुळावरची ओवी ॥ या शिर्षकाखाली असलेल्या ओव्या या नामदेव बुवा महाराज सावंगा यांनी मांडलेल्या ४५ दिवसाच्या मांडीतील जाणते बुवा महारांज ईत्यांदी जाणते गणांनी, नामदेव बुवा महाराज चे निकटचे अनुयायी व त्या मांडीचे भजनगडयांचे व्यवस्था सांभाळणारे भजनयोगी श्री गणपतराव सोनुले, वाढोडा-खुंटे ता. आर्वि, जी. वर्धा यांना मुळावरच्या ओव्यांचे देणं पुढच्या काळाकरीता चालवण्यासाठी दिलेल्या होत्या. तेच काही देणं त्यांनी जळगाव दांडचे भजनयोगी श्री गोवर्धन पाते, सोनुरं-देवीचे, ता. धामणगाव, जी. अमरावती यांना पुढंच्या काळाकरीता चालवण्यासाठी दिले. आणी ऐसे हे सावंगा-जळगाव दांडचे मुळावरचे देणं हे कृष्णाजी-हेंगडुजी ने आपले कुणालाही न कळणारे कळसुत्रे हालवुन बाहुल्या नाचवत, त्या कळसुत्राच्या मालकाने श्री गोवर्धन पाते यांची भेट घालुन, त्यांना आम्हा घरी आणुन ते सावंगा-जळगाव दांड चे देणं आम्हास २०१७ समोर च्या काळात चालवण्याकरीता शब्दार्थसह दिलेले आहे. तेच देणंप्राप्त ओव्या ॥ सावंगा-जळगाव दांडची मुळावरची ओवी ॥ या शिर्षकाखाली दिलेले आहेत.

तर ॥ 'कृष्णपुरी ची ओवी' ॥ या शिर्षकाखाली असलेल्या अरज, ओवी, आरत्या ह्या कृष्णपुरी दांडचे देणं कृष्णपुरीचे खेत्री संत श्री दशरथ तिजारे, भातकुली, ता. धामणगावरेल्वे, जी अमरावती यांनी त्यांचे सुपुत्र असलेले कृष्णपुरीचे लढवये श्री मनोहरराव तिजारे, ह. मु. यवतमाळ यांना दिले. आणी तेच कृष्णपुरीचे देणं श्री मनोहरराव तिजारे यांनी कृष्णपुरीचे शब्दार्थ व चरणार्थ सह आम्हास दिलेले आहे. त्यामुळे येथे दिलेल्या जवळपास ८० प्रतिशत कृष्णपुरी खंडाच्या ओव्या यांच्याकडुन प्राप्त झालेल्या आहेत.

जास्तीचे चरण जर तुमच्या म्हणणीत नसेल किंवा तुमच्या दांडाचे नसेल, तर ते चरण तुमच्या ईच्छेप्रमाणे तुमच्या म्हणणीत किंवा दांडात सामील करून चतुर्पती नाम ओलवुन वाढवु शकता. किवां विचार करून गाळु शकता. हे तुमचे तुम्हीच ठरवावे. तुम्हास कळेन तसे म्हणा ! आम्ही तर या देहीचा राहु आत्मा आमच्या सत् यवगावर येवुन गायन करत आहे. यातच समाधान मानत या राहु ला कधी ना कधी सत्य प्रकाश येण्याची वाट पहात आहेत.

काल प्रवाहा मुळे काही काही ओवीतील चरणे वर-खाली झालेले होते/आहेत. अश्या काही काही अस्ताव्यस्त ओवीतील चरणांचा कम जुळवण्याचा शक्यतो प्रयत्न कृष्णकृपेने केला आहे. तरी सुध्दा काळाच्या मा-यापुढे चरणे वर-खाली राहण्याची शक्यता राहु शकते. याच कारणामुळे या चतुर्पता अथर्वन् वेदात सर्वच चरणांना कम नंबर न देता, पहील्या व वाढत्या चरणाला व मध्ये चार चार चरणां नंतर कम नंबर दिलेले आहेत. बाकी मधल्या चरणांचे कम नंबर हे तुम्ही तुमच्या गायन म्हणनीप्रमाणे देवुन गायन करू शकता. अथवा या चतुर्पता अथर्वन् वेदात ज्या कमाणे चरणे दिलेले आहे, त्या कमाणे जसेच्या तसे गायन करू शकता. गायन करावे. ही विनंती.

## ॥ विनवणी अर्ज ॥

हरी हरी कृष्णा परमेश्वरा सच्चिंत्तानंदा !

तुच आम्हावर कृपा केली. हद्‌यात प्रेम ग्यान भक्ती जागृत करुन चतुर्पतीच्या भजन पुंजन ध्यान सुमरनी लावुन अंतरी घंटा वाजवला. आम्हाला हाती धरलेत. नामाचा घोक दिलात. आम्हाला तुमच्या चतुर्पती निरंजन ग्यानपिंडाचा प्रकाश वेळोवेळा दिलेत. वेळोवेळा जेव्हा आवश्यकता असेल किंवा जेव्हा आंतरीक ईच्छा झाली, तेव्हा या हद्‌यी अंतःकरणी स्फुरण दिलेतं.

तुमच्या या अंतःकरणातील स्फुरणामुळे धियो उत्तेजीत होवुन, त्या उच्चत्तर अश्या बुध्दीने मन इद्रिये ताब्यात घेवुन या मन बुध्दिला तुमच्या कृपेने पक्के बांधले. या कर्मेंद्रिया व्दारे तुमचे भजन ध्यान सुमरन करत, प्रपंच करुन परमार्थ साधवत साधवत नित चतुर्पता नामी ठेवलेत. आम्हाला तुम्ही हस्तक बनवुन सर्व निरसन आमच्याकडुन करुन करवुन घेतले. हे निरसन करण्यासाठी वेळावेळा मदत केली. निरसनाकरीता ज्या ज्या वेळी ज्या ज्या ग्यानाची आवश्यकता पडली, ते सर्व ग्यान आम्हास त्या त्या वेळी पुरविलेत. अनुभवांची गाही दिलीत. दृष्टांत दिलेत. दृष्टांत देत निरंतर १७ वर्षे ग्यानाचा वर्षाव करत राहीला. निरसनाची अखंड स्फुर्ति देत राहीला. अंतिम धैय च्या वाटेवर असलेले यश अपयश पचवण्याची ताकद देवुन, जिथे कुठे अडखळलो त्या अडखळलेल्या स्थितीतुन बाहेर काढत अंतिम धैय प्राप्त करण्यास साहयं झाला. असेच साहय सच्च्या भक्तांना नित करत राहावे. हीच नित अर्ज.

आम्हाला हस्तक बनवुन या माध्यमाचा तुच कर्ता तुच करविता व तुच सत् बुध्दिचा दाता होवुन तुच हे निरसन करुन घेतलेले आहेत. धन्य भाग्य आमचे थोर ! म्हणुनच आम्ही वेळोवेळा विनवणीपुर्वक अर्ज करुन म्हणतो की :

॥ धन्य देवाची किर्त महीमा, कारागीरी तुही ।
धन्य देवा तु कारागीर । उभा ठाई ठायी ।
करुन भक्ती नाम कंठी । ठेवला हद्‌यी ॥

हे नटेश्वरा कृष्णा ! अवताराचे सोंगे घेवुन मौजेने आमचे सर्व कामे व कर्मे करणारा आपणच इथं नटला आहे. तुच आमचा गुरु ! तुच आमचा पिता ! तुच आमचा सर्वकाही बनुन कोणत्या ना कोणत्या रुपाने साक्षात्कार, गाही पुरावे सच्च्या भक्तांना देत आहात. सच्च्या भक्तांना निरंजनी भेटी देत आहात. निरंजनी भेटी देता ! मुजरा आहे बा अवधुता ! तुमच्या चरणी आमचा माथा ।

आपणच आपल्या भक्ताच्या हद्‌यात शिरुन आपणच आपला ग्यानपिंड प्रेरीत करत राहतो. निरंजन प्रकाश देत राहतो. धियो प्रचोदयात् करुन देहा जागृत करत राहतो. खुण-मुद्रा देत राहतो. आपणच गुरु बनतो. आपणच शिष्य बनतो. आपणच आमचे माता पिता बनतो. आपणच मालक बनतो. आपणच चाकर बनतो. सर्वकाही बनतो. ही तुमची अमर्याद बुध्दीची अनंत माव काही केल्या आमची मर्यादित बुध्दी जाणु शकली नाही. इथं आम्ही गोंधळुन जातो. म्हणुनच थकुन आम्ही तुलाच पुनःपुनश्च विणवनी अर्ज करतो की :

*हरी हरी कृष्णा !* हे अनंता । तुम्ही अनंत असल्यामुळे आम्ही तुम्हा कडुन कितीही मिळवीले तरीही अजुन मिळवण्यासाठी काहीना काही शिल्लक च राहील. तुम्हा कडुन घेता घेता आम्ही थकुन जावु. परंतु तुम्ही देता देता थकणार नाही. आम्ही चुकुन जावु. परंतु तुम्ही या पिंडी या ब्रम्हांडीच्या तिरलोक्याशी नाही चुकणार !. आमचे पात्र ज्ञानरुपी पाण्याने भरुन जावुन वरतुन वाहत राहील. परंतु या परमात्माच्या चौकोणी मेघांची वर्षा चालुच राहील. तो भरुन भरन आणी अंती पुरुन उरलेलाच राहीन. तुमच्या ज्ञानरुपी पावसाच्या वर्षावाव्दारे आम्ही नित ओलेचिंब होवुन राहील्यामुळे आमच्यावर एक वेळ अशी

येते की आम्हीच पुनःपुनश्चः विनवातो की : हे अनंता ! आता थांबव बापा हा तुझा चौकोणी मेघांचा पाउस ! आम्ही अति ओलेचिंब झाल्यामुळे थंडीने आम्हा हुडहुडी भरली आहे. शिण आला आहे. आमचे देहीचे तिरभवन थरथर कापत आहे. आता दयाहो थोडी उष्णता । पुरवा हो तुमचे तेज ! आणी तेही तुम्ही पुरवत राहता.

जेव्हा तुमच्या तेजाची जलजलाट सहन होत नाही. पुन्हा देहीचे तिरभवन थरथरा कापते तेव्हा आम्ही पुनंः शितलता मागतो. आणी तेही तु पुरवत पुरवत आम्हा भक्तांचे जीवनभर न संपणारे एका मागुन एक मागण्यांचे चक्र फिरवत ठेवत भक्तांच्या मागण्या पुरवत पुरवत पुरून उरतोच. हे अनंता ! अंती तुम्ही उरलाच. तुच भरून भरला आणी उरला. तुमचा अंत नाही कळाला ! हे कळसुत्राच्या मालका ! तुमची कळसुत्र कळा कळेना कोणाला । हे आता तुमच्याच कृपेने निश्चित जाणतो.

हे अनंता । तु अनंत. तुझे हरीनाम अनंत. तुझे ज्ञान-ग्यान गिण्यान अनंत. तुझी माव अनंत ! तुमची अनंत माव-लिला व किर्त-महीमा सह चतुर्पती निरंजन ज्ञान ईत्यादी बध्दल लिहता लिहता आमची ही देहरूपी धरतरी आटत आटत पुर्णपणे आटुन जाईल. तरीसुध्दा तुमची अनंत माव-लिला व किर्त-महीमा सह चतुर्पति ज्ञान महीमा अस्तुकीचे लिखाण पुर्ण होणार नाही. हे लिखान अपुर्णच राहील. तुमच्या बध्दल सांगावयाच्या काही गोष्टी अपुर्ण अपुरच राहील ! हे आम्ही आता चांगल्या रितीने तुमच्याच कृपेने जाणतो.

या अपु-या अपुर्ण मानवाकडुन, पुर्ण परमात्मा कृष्णा चे अनंत माव-लिला, किर्त-महिमा व संपुर्ण चतुर्पती ज्ञान व अस्तुकी महीमाचे लिखान पुर्ण होवुच शकत नाही.

तुमच्या अनंत माव व चतुर्पती ज्ञानाच्या न संपणा-या अपार गोष्टी आमच्याव्दारे शेवटी अपुर्ण अपु-या राहील. हेही आम्ही तुमच्याच कृपेने अत्यंत चांगल्या रितीने जाणल्यामुळे सरतेशेवटी तुमच्याच कृपेने तुम्हीच दिलेला तुमचाच चतुराईचा गुणाचे देणं वापरण्यास आज्ञा घेतो ! आणी याच चतुराईच्या गुणांचे देणं वापरून आता आम्हीसुध्दा चतुराई करून हे आमचे अपुर अपुर्ण लिखान स्तंभित करून तुम्हा समोर हात जोडुन उभे राहतो. आणी विनवणीपुर्वक अर्ज करत आम्ही तुमच्या या चतुर्पता अथर्वन वेदात प्रवेश घेण्यासाठी तुमची आज्ञा मागतो. कृष्ण महाराज धनी अवधुता ।

॥ कृष्ण महाराज धनी अवधुत ॥



## ॥ वेद प्रवेश प्रस्तावना संपुर्ण ॥

पुढील भाग पुढील पानावर...

B: Blank Page102